# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

☎ २५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com


**<u>तांतडीचे</u>**
**<u>कालमर्यादा : दिनांक १०/०६/२००९.</u>**

जा. क्र. : तंशिविकापु/विवि/सांख्यिकी/२००९/ ५३८९ दिनांक 6 JUN 2009

प्रति,

प्राचार्य / संचालक,

(या कार्यालयाच्या अधिपत्याखालील

सर्व संस्था)

**विषय : सांख्यिकी माहिती अद्ययावत करणेबाबत..**

उपरोक्त विषयासंदर्भात कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेची दिनांक ३० सप्टेंबर, २००७ व ३० सप्टेंबर, २००८ पर्यंतची सांख्यिकी माहिती Internet च्या माध्यमातून On line पध्दतीने संचालनालयाच्या संकेत स्थळावर भरणेबाबत कळविण्यात आलेले होते. परंतु सदर माहिती ब-याच संस्थांनी अद्यापही भरलेली नाही., किंवा अपूर्ण भरलेली आहे. तरी या पत्राद्वारे आपणांस पुन्हा कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील अभ्यासक्रमाची ३० सप्टेंबर, २००८ अखेरची माहिती संचालनालयाच्या संकेत स्थळावर आपल्या संस्थेच्या Login द्वारे दिनांक १० जून, २००९ पर्यंत पूर्णपणे भरण्यात यावी व भरलेल्या माहितीचा अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावा.

सदरची माहिती आपण त्वरित न भरल्यास आपल्या संस्थेची प्रशासकीय, तसेच शैक्षणिक बाबींची संचालनालय, मुंबई व या कार्यालयाच्या स्तरावरील कोणतीही कामे केली जाणार नाहीत, असे मा. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सुध्दा कळविले आहे., याची नोंद घ्यावी व त्वरित कार्यवाही करावी.

गोपंचौधरी

( गो. पं. चौधरी ),
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

*Z:\pmd\Vidyarthi Vibhag.doc/8*